

'स्वामी तिन्ही जगाचा, आईविना भिकारी' या उक्तीनुसार आईचे महत्त्व आपण सगळेच जाणून असतो. आईशिवाय या जगात कोणीही श्रेष्ठ असू शकत नाही. म्हणून आई हेच दैवत मानून तिची मनोभावे सेवा करण्यासारखे दुसरे कर्तव्य नाही.

जन्मदात्री आई, धन-धान्य देणारी काळी आई, जीवनाच्या उन्नतीचा मार्ग दाखविणारी दैवतमाउली, संवादाद्वारे जग जवळ आणणारी मातृभाषा आणि सर्वांना सामावून घेणारी मातृभूमी या सर्वच मातृरूपांचा भावनिक परिचय करून देणाऱ्या 'मातृपंचक' या पुस्तकातील कवितांचा समीक्षात्मक आढावा घेणारा 'मातृपंचक : आस्वाद आणि आकलन' हा ग्रंथ निश्चितच असंख्य विद्यार्थी, अभ्यासक आणि अध्यापकांना दिशादर्शक ठरावा हीच अपेक्षा!

डॉ. संदीप विठ्ठलराव सांगळे
माजी सदस्य,
मराठी अभ्यास मंडळ,
पुणे विद्यापीठ

ISBN No.: 978-93-83471-28-7

यशोदीप पब्लिकेशन्स,
पुणे.

मातृपंचक: आस्वाद आणि आकलन    डॉ. संदीप विठ्ठलराव सांगळे    यशोदीप पब्लिकेशन्स

# मातृपंचक :

## आस्वाद आणि आकलन



संपादक : डॉ. संदीप सांगळे

02

ारी
ंत
णे
च

# जन्मदात्री आई

प्रा. डॉ. राजेंद्र ठाकरे

'मातृपंचक' या कवितासंग्रहामध्ये पाच प्रकारच्या मातृप्रतिमांचा समावेश करण्यात आला आहे. जन्मदात्री आई, काळी आई, दैवत माउली, मातृभाषा आणि मातृभूमी या पाचही मातृप्रतिमांनी मराठी मन समृद्ध झाले आहे. मराठी माणसाच्या व्यक्तिमत्त्वाला विलोभनीय असा आकार जन्मदात्री आईने दिला आहे. त्यामुळेच मराठी माणसाच्या सांस्कृतिक जीवनाला संपन्नता प्राप्त झालेली दिसते. जन्मदात्री आईची थोरवी अनेक प्रतिभाशाली कवींनी कवितेतून मांडली आहे. आईची थोरवी अनेक प्रतिभावंत साहित्यिक, विचारवंत, अभ्यासकांनी पुढीलप्रमाणे सांगितली आहे.

आईचा ममतेचा एक बिंदूही अमृताच्या समुद्रापेक्षा मधुर असतो. आईच्या प्रेमाची भरपाई कोणताही पुत्र, मग तो तिन्ही लोकांचा स्वामी असला तरी करू शकत नाही. आईच्या डोळ्यांतील रागाच्या पाठीमागे वात्सल्याचे सागर उचंबळत असतात. आई पृथ्वीपेक्षाही महान आहे. एक आई शंभर शिक्षकांच्या बरोबर असते. आई, माँ या शब्दांहून उच्च शब्द जगात कोठेही नाही व एखाद्या उमललेल्या फुलापासून जसा त्याचा रंग आणि गंध वेगळा करता येत नाही. तसेच आई आणि लेकराचे नाते असते. असे अनेक गौरवपर उद्गार आईविषयी मान्यवरांनी काढलेले दिसतात.

या लेखात जन्मदात्री आईचाच आपण येथे विचार करणार आहोत. जन्मदात्री आईच्या आठवणी फ.म.शहाजिंदे, फ.मुं.शिंदे, नामदेव ढसाळ, अरुण काळे आणि उत्तम कांबळे यांनी कवितेतून कशा सांगितल्या आहेत याचे चित्रण पुढीलप्रमाणे.. ज्याप्रमाणें काटेरी झाडाला फुले शोभिवंत बनवतात. त्याप्रमाणे आई आपल्या मुलांचे जीवन संस्काराने संपन्न करते. आपल्मा जन्मदात्री आईचा गौरव झाला तरच आपले जीवन फुलासारखे सुगंधित होईल म्हणूनच 'मातृपंचक' हा काव्यसंग्रह संपादक मंडळाने तयार केलेला दिसतो.

''आई एक नाव असतं
घरातल्या घरात गजबजलेलं
गाव असतं''

ह्या सुरुवातीच्या ओळी मनोवेधक आहेत. आईचे घरातील अस्तित्व किती महत्त्वाचे आहे याचा प्रत्यय वरील ओळींतून येतो. आई संस्काराची शिदोरी आहे. म्हणूनच कवी म्हणतात की आई संस्काराचे धन मनामनांत देऊन जाते. आई आपले आयुष्य प्रकाशमान करते. म्हणूनच कवी म्हणतात की,

''आई असतो
एक धागा
वातीला उजेड दावणारी
समईतली जागा''

आई कुटुंबातील सर्व घटकांना जोडणारा धागा असतो. आई वातीला उजेड दावणारी समईतला एक जागा असते. आईमुळेच घरात उजेडाचा वसा टिकून राहतो. घर प्रकाशमान आईच करते. आई जर नसली तर होणारे दुःख किती भयावह असते, याचे चित्रणही कवी हृदयद्रावक शब्दांत करतात. आई जर नसली तर जीवन अंधारमय होऊन जाते. गाम गोठ्यात आपल्या वासरासाठी हंबरते. तसेच आई ही आपल्या लेकरांसाठी सर्वस्व असते. म्हणूनच कवी म्हणतात की,

''आई खरंच काय असते ?
लेकराची माय असते
वासराची गाय असते
दूधाची साय असते
लंगड्याचा पाय असते
धरणीची ठाय असते''

आई म्हणजे लेकराची माय, वासराची गाय, दूधाची साय, लंगड्याचा पाय, धरणीची ठाय ह्या प्रतिमा सहज सोप्या असून हृदयस्पर्शी आहेत. आई जन्माजन्माची संस्काराची शिदोरी असते. सरतही नाही वा कधी उरतही नाही. आई आयुष्यभर लेकरांना संस्काराचे धन देते. रक्षण करते. असे सर्वस्व देणाऱ्या आईचे मोठेपण कवीने वर्णन केले आहे. 'आई आणि इतर कविता' या कवितासंग्रहातून 'आई' ही कविता घेतली आहे.



- **आई – नामदेव ढसाळ**
- **जीवन परिचय**

नामदेव ढसाळ हे प्रतिभासंपन्न कवी आहेत. ढसाळांची कविता रोखठोक व क्रांतिप्रवण आहे. माणुसकीच्या आवेगाने सळसळत येणारी त्यांची कविता रसिक मनाला झपाटून टाकते. बैचेन करते. झोप उडवते. एकूणच मराठी काव्यजगतातच खळबळ माजवून देणारा अत्यंत सामर्थ्यवान, विद्रोही व बंडखोर कवी म्हणून नामदेव ढसाळ यांचे नाव मान्यता पावले आहे.

नामदेव ढसाळांचा जन्म पुणे जिल्ह्यात झाला. कवितेखाली कित्येकदा ते आपल्या नावाला आईचे (साळुबाई) नावही जोडतात. एस.एस.सी.पर्यंतचे शिक्षण. चरितार्थासाठी दीड वर्ष टॅक्सीड्रायव्हरचा व्यवसाय केला. दलित पॅन्थर या संघटनेचे ते सक्रिय कार्यकर्ते, नेते, वंचित, नाकारलेल्या समाजाला न्याय मिळावा म्हणून ते सतत लढताना दिसतात. अस्पृश्यतेने, जातीयतेने, अंधरूढींनी ग्रासलेल्या व विषमतेने पोसलेल्या संस्कृती व व्यवस्थेवर कवितेच्या माध्यमातून ते प्रहार करतात. त्यांच्या कवितेतून दलितांचे, वंचितांचे जीवन अभिव्यक्त झाले आहे. 'गोलपिठा', 'मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलविले', 'तुही इयत्ता कंची', 'खेळ', 'आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्र प्रियदर्शनी', 'या सत्तेत जीव रमत नाही', 'चिंध्याची देवी आणि इतर कविता' इत्यादी कवितासंग्रह प्रसिद्ध. 'हाडकी हाडवळा', 'निगेटिव्ह स्पेस' या कादंबऱ्या, तसेच इतरही वैचारिक पुस्तके त्यांनी लिहिली आहेत. पण विद्रोही कवी म्हणूनच त्यांची ओळख आहे. भारत सरकारने त्यांना पद्मश्री पुरस्कार देऊन गौरवले आहे.

- **'आई' कवितेचे रसग्रहण**

नामदेव ढसाळ यांनी 'आई' या कवितेत आईच्या वियोगाचे दुःख मांडले आहे. तसेच आईच्या आठवणीही त्यांनी सांगितल्या आहेत. नामदेव ढसाळ यांची ही आई ग्रामीण आई आहे. आपले खेडे सोडताना तिने मरिआईचा गाडाही तिथेच सोडून आली. विस्थापित होऊन कवीचा बाप अगोदरच शहरात आलेला असतो. गरीब परिस्थितीमुळे आई-वडिलांनी खूप दारिद्र्य भोगले. खूप कष्ट केले. शिळ्या भाकरीचे तुकडे मोडून खाल्ले. साडीला ठिगळे लावीत ती जगत राहिली. आयुष्यभर दुःख, दारिद्र्य, कष्ट, उपासमार याशिवाय दुसर काहीच तिच्या वाट्याला आले नाही. कवी म्हणतात –

लांब गेलेले दिसतात. अगतिक होऊन कवी आपल्या मनात सलणारे दु:ख पुढीलप्रमाणे व्यक्त करतात -

**''आइ, आज मी अगतिक होतो.**
**तारेवरची कसरत करतो.**
**'जनरेशन गॅप'बद्दल बोलतो**
**स्वत:चे वेगळे घरटे बांधतो**
**स्वत:ची फसवणूक करतो**
**कधीमधी तुला चोळी-बांगडी घेतो.**
**किंवा देतो दोनचार रुपये 'दवा-दारुला'**
**आणि सांगत बसतो आल्या गेल्याला ....!**

अशाप्रकारे कवी आपल्या आईला कधीतरी चोळी-बांगडी घेतात. दवाखान्यासाठी पैसे देतात आणि लोकांना सांगतात की, आईची सेवा आम्ही मनापासून करीत आहोत. मध्यमवर्गीय लोकांच्या मानसिकतेचे प्रातिनिधिक स्वरूपात कवीने रेखाटलेले चित्र वास्तवदर्शी आहे. 'आईसाठी' ही कविता 'रॉकगार्डन' या कवितासंग्रहातील आहे.

- **माझी गरीब माऊली -उत्तम कांबळे**
- **जीवन परिचय**

ज्येष्ठ साहित्यिक उत्तम मारुती कांबळे यांनी मराठी साहित्यात मोलाची भर घातली आहे. कविता, कथा, कादंबरी, ललित गद्य, संशोधनपर ग्रंथ, संपादित ग्रंथ, आत्मकथन इत्यादी विविध साहित्यप्रकारांत त्यांनी लेखन केले आहे. घरची परिस्थिती प्रतिकूल असून संघर्षातून उभे राहिलेले उत्तम कांबळे हे प्रतिभावंत कवी आहेत. मोलमजुरी करून राज्यशास्त्र या विषयात त्यांनी बी.ए. केले. आई शेतमजूर. घरच्या गरीब परिस्थितीमुळे कंपाऊंडर, विक्रेता, मजूर इत्यादी कामे करीत त्यांनी शिक्षण पूर्ण केले. सामाजिक बांधिलकी मानणारा पत्रकार म्हणून त्यांनी आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. वृत्तविद्या विभागात काही वर्षे अध्यापनाचेही काम त्यांनी केले. सामाजिक बांधिलकी असलेले वास्तवपूर्ण लेखन त्यांनी केले.

'जागतिकीकरणात माझी कविता', 'किनाऱ्यावरचा कालपुरुष', 'नाशिक, तू एक सुंदर कविता' इत्यादी कवितासंग्रह प्रसिद्ध. 'आई समजून घेताना' हे त्यांचे सुप्रसिद्ध आत्मकथन. चौऱ्यांशीव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे



अध्यक्ष. अनेक पुरस्कारांनी सन्मानित झालेले हे लेखक आहेत. त्यांच्या कवितांचा इतर भाषांमध्येही अनुवाद झालेला आहे.

- **'माझी गरीब माउली' कवितेचे रसग्रहण**

उत्तम कांबळे यांनी वरील आपल्या गरीब अशा माउलीचे चित्रण केले आहे. कवींना घडवणारी, ही माउली त्यांना आपल्या जीवनाची वाट दाखविणारी सावली वाटते. या माउलीची परिस्थिती अत्यंत गरिबीची आहे. गावकुसाबाहेर तिची फाटकी झोपडी आहे. जुन्या जखमा मोजत नवे स्वप्न पाहाणारी ही गरीब माउली आहे. तिच्या फाटक्या झोपडीत अत्यंत दारिद्र्याचे जीवन ती जगते. ठिगळे लावून लावून जगण्यातच तिची जिंदगी जाते. कवी तिच्या फाटक्या जीवनाचे चित्रण पुढीलप्रमाणे करतात -

**''तिच्या फाटक्या झोपडीत**
**धोंड्या-दगडाची चूल**
**धूर चुलीतला**
**माय कोंबते डोळ्यांत सारा**
**धुरामंदीच उगवती**
**तिची उजेडाची गाणी**
**माझी गरीब माउली ...''**

कवीची ही गरीब माउली ही फाटक्या झोपडीतील आहे. दगडाची चूल मांडलेली आहे. चुलीतला धूर डोळ्यांत जातो. अश्रू येतात. अशा या दु:खी जीवनातही ही आई उजेडाची गाणी गाते. येणाऱ्या उद्यासाठी आज त्याग करताना दिसते. या झोपडीत कवींच्या भावंडांच्या अंगावर वस्त्रं नाहीत. मायेची ऊब देण्यासाठी ही आई आपल्या लेकरांना आपल्या पंखाखाली घेते. गरिबीचे चटके सहन करणारी ही आई या फाटक्या झोपडीत व्यसनाधीन पतीचा मारही खाते. तिच्या त्या फाटक्या संसाराच्या फाटक्या झोपडीत ती दु:खी-कष्टी असतेच, तर कधी अश्रूंच्या माध्यमांतून आपल्या स्वप्नांना वाट करून देते.

**''तिच्या फाटक्या झोपडीत**
**असे धीराचा डोंगर**
**आतडी करती वळवळ**
**तरी लढायाचं बळं**
**तिची घेउनी युद्धगाणी**
**आम्ही जिंकली लढाई...''**